M.S.P.Mandal's

R.B.Attal Arts, Commerce & Science College, Georai

Dist. Beed (Maharashtra)

Call For Chapters/Articles for E-Book (ISBN) Entitled

***Status of Women at 75th Anniversary of Independence***

**Sub. : Thems**

# भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे आणि चित्रपटांमध्ये महिला सक्षमीकरण

संशोधनकर्ती

**प्रा.सौ.नंदा निवृत्ती मास्कर**

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

मोताळा, जि. बुलडाणा

# भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे आणि चित्रपटांमध्ये महिला सक्षमीकरण

**प्रा.सौ.नंदा निवृत्ती मास्कर**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख,
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
मोताळा, जि. बुलडाणा

भारत आपल्या स्वातंत्र्याची 75 वर्षे तमाम भारत देशवासियांसाठी एक खास पर्व आहे. आज देशाने सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, लष्करी, क्रीडा आणि तांत्रिक क्षेत्रात विकासाच्या प्रवासात अनेक नवे विक्रम झाले आहेत. चित्रपट क्षेत्रही त्याला अपवाद नाही. भारतीय चित्रपटसृष्टीची सुरूवात ही पौराणिक चित्रपटांमधून झाली असली तरी सामाजिक चित्रपटांनी समाजमनावर आपले स्थान निर्माण केले. समाजात वावरत असतांना सर्जनशील व संवेदनशील व्यक्तींना अनेक चित्रपटांकरीता विषय मिळाले. त्या काळातल्या अनेक प्रश्नांपैकी स्त्रियांचे समाजातले स्थान हा एक गहन प्रश्न होता.

समाजातल्या महिलांना योग्य स्थान मिळावे, त्यांचे व समाजाचे प्रबोधन व्हावे असे विषय पडद्यावर आणले. 1940 साली 'अछुत कन्या'तून एका दलित महिलेची कथा सांगण्यात आली. त्यानंतर हिंदी चित्रपटांमध्ये स्त्रीला आदर्शवादी, प्रेमळ आई, बहिण, वहिनी, मुलगी, पत्नी आणि मैत्रीण म्हणून दाखविले. जी क्षणभर बंडही करते व भावनेने किंवा विरोधामुळे शेवटी शरणागती पत्करते. अशा चित्रपटांमध्ये 'चित्रलेखा', 'महल', 'दहेज', 'सुजाता', 'मैं चूप रहूँगी', 'बंदिनी', 'काजल', 'साहब बीबी और गुलाम', 'पाकिजा', 'परिणीता', 'निकाह', 'उमराव जान' इ. स्त्री जाणिवेने सुसज्ज चित्रपटांची निर्मिती झाली.

1980 नंतर समांतर सिनेमाने स्त्रियांच्या मुक्त भावनांना नवे आकाश दिले. स्वातंत्र्याचे नवे रंग मिळाले, त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव मिळाली. अशा चित्रपटांमध्ये सदर 'मदर इंडिया', 'मंडी', 'बाजार', 'भूमिका', 'मिर्च मसाला', 'वॉटर', 'फायर', 'दामिनी', 'सत्ता', 'अस्तित्व', 'जुबेदा', 'चांदनीबार', 'लज्जा', 'गुलाबगँग', 'फॅशन', 'क्विन', 'मेरी कोम', 'इंग्लिश विंग्लीश', 'मर्दानी' इ. चित्रपटांनी नवा आयाम देवून स्त्रीची बदलती प्रतिमा अत्यंत संवेदनशीलतेने मांडली.

**हिंदी चित्रपट सृष्टीतील महिला सक्षमीकरण :**

पारंपारिक स्त्रीभावनेला छेद देणाऱ्या विषयांवरही चित्रपट तयार झाले. अशाच काही चित्रपटांमधून स्त्री चेतना शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

१) मदर इंडिया (1957) :

राधा ही शेती करणारी स्त्री आहे. पतीच्या पश्चात मुलांचा सांभाळ करून स्वत:चे नशीब घडवते. अत्याचार करणाऱ्या आपल्याच मुलाला मारते. ऐंशीच्या दशकातील कौटुंबिक चित्रपटांमध्ये पारंपारिक परिस्थितीविरूद्ध बंडखोर आणि क्रांतिकारी स्त्रीचे चित्रण सुरू झाले. प्रचलित व्यवस्थेत महिलांचे स्थान टिकवून ठेवण्यासाठी तिचे परस्पर वैर चित्रपटांमधून उमटत होते. काळाच्या प्रकोपाला तोंड देत परिस्थितीने भाग पडलेल्या महिला प्रातिनिधीक स्वरूपात सिनेमाच्या पडद्यावर दिसल्या. पुरूषप्रधान व्यवस्थेत स्वाभिमानाने जगणारी स्त्री आंतरिक शक्ती ओळखू लागली. विवाह संबंधावर आधारीत 'अर्थ' (1982) स्त्री जीवनाचा आंतरिक संघर्ष या चित्रपटात मांडलेला आहे. पुजाचा नवरा इंदर जो घराचे स्वप्न पाहतो. मानसिकदृष्ट्या अस्थिर कवितासाठी पूजाला सोडून जातो. पूजा नोकरी मिळवून आयुष्यातील अडचणींशी झुंज देत असतांना कविता पुजाचे लग्न मोडल्याच्या अपराधाने इंदरला सोडते. पुन्हा पूजाकडे येण्याचा प्रयत्न इंदर करतो तेव्हा पूजा त्याला आपल्या आयुष्यात येण्यास नकार देते.

एक चादर मैलीसी (1986) मध्ये परंपरेतून निर्माण होणाऱ्या स्त्रियांच्या समस्यांचे चित्रण करण्यात आले आहे. 'राणो' ही चित्रपटाची नायिका. हिला दोन मुले असूनही हुंड्यासाठी सासुकडून छळ होतो. दारूड्या पतीकडून मारहाण. जेव्हा राणोच्या पतीचा बलात्काराच्या आरोपात खून होतो, तेव्हा राणोला तिच्यापेक्षा 10 वर्षांनी लहान असलेल्या दिरासोबत चार घालण्याच्या परंपरेनुसार लग्न लावले जाते.

रूदाली (1993) मध्ये उच्च जातीच्या पुरूषांच्या मृत्युबद्दल शोक साजरे करणाऱ्या राजस्थानच्या महिला व्यावसायिक जातीच्या स्त्रियांचे चित्रण करण्यात आले आहे. स्थानिक जमीन मालकाचा मुलगा नायिकेचा प्रियकर आहे. पण तिचा मद्यपी पती मृत्यु, अपंग मुलाचे भविष्य पाहून ती गरीबीतही प्रियकराकडे पैसे मागत नाही.

दामिनी (1993) या चित्रपटातून बलात्काराच्या समस्येवर आधारीत एका महिलेच्या न्यायासाठी संघर्षाची कथा आहे. जी पीडित मोलकरीणसाठी तिच्या स्वत:च्या श्रीमंत सासरच्या लोकांविरूद्ध उभी राहते. दस्युराणी फुलनदेवी यांच्या जीवनावर आधारीत 'बँडिट क्वीन' (1994) फुलनच्या माध्यमातून खालच्या जातीतील महिलांचे लैंगिक शोषण, पोलिसांचे असहकार, बलात्कार, डकैत बनण्यासाठी हातात बंदूक घेऊन बदला घेणे, शेवटी पक्षातील महिला आणि लहान मुले यांना डोळ्यासमोर आत्मसमर्पण करते. 'फायर' (1996) हा समलैंगिकतेच्या विषयावरील पहिला भारतीय चित्रपट आहे. राधा आणि सिता या पात्रांमधून प्रकट होते की, स्त्रियांनाही लैंगिक सुखाचा अधिकार आहे. पण जर नवरा तिला सुख देऊ शकत नसेल तर स्त्री परंपरा आणि दुर्दैवाच्या साखळ्या तोडून कर्मकांडाच्या विरोधात बंड करते. 'मृत्युदंड' (1997) हा चित्रपट महिलांवरील सामाजिक आणि लैंगिक अन्यायावर आधारित आहे. केतकी या चित्रपटाची नायिका अत्याचारित गाव प्रमुखापासून आपल्या पतीला योग्य मार्गावर आणते आणि गावातील स्त्रियांचेही रक्षण करते.

'चांदनी बार' (2001) एका जातीय दंगलीत आपले कुटुंब गमावलेली मुमताज, काकाच्या वासनेची शिकार झालेली मुंबईच्या डान्सबारमध्ये नाचण्याची आणि फ्लर्ट करण्याची तयारी करते. एका गुंडाशी लग्न करून काही क्षण आनंदाने जगते. पण नवरा चकमकीत मरण पावतो. आपल्या मुलाला तुरूंगातून सोडविण्यासाठी मुमताजला शरीर विकावे लागते. 'फिजा' (2001)मध्ये मुंबई दंगलीत हरवलेल्या आपल्या भावाचा शोध घेणाऱ्या बहिणीची कथा आहे, की जो दहशतवादी बनला आहे. शेवटी त्या भावाची ती हत्या करते. 'जुबैदा' (2001) मधून जगण्याच्या स्वातंत्र्यापासून आणि आत्मनिर्णयाच्या क्षमतेपासून दूर असलेल्या नायिकेचे बंड दाखविले आहे. वडिलांचा अहंकार, समाधानाचे साधन बनलेल्या झुबैदाला करिअर, लग्न, घटस्फोट असे निर्णय स्वतंत्रपणे घेता येत नाही. आकाशाची स्वप्ने पाहणारी झुबेदा बंड करून फतेहपूरच्या राजाशी लग्न करते पण अनेक अटींसह.

'डर्टी पिक्चर' (2011) दाक्षिणात्य अभिनेत्री सिल्क स्मिताचे वादग्रस्त जीवन रेखाटले आहे. प्रेक्षकांची अश्लील वृत्ती, पैसे कमावण्याची अव्यावसायिक पद्धत. चित्रपटात नाव कमावण्याची इच्छा असलेली रेश्मा योग्य मार्ग न मिळाल्यामुळे सर्वस्व पणाला लावते. ती पडद्यावर निर्लज्ज होते. पण तिची बंडखोरी समाजातील वाईट वृत्तींवर प्रहार करायला थांबत नाही. व्यावसायिक अपयश,

व्यसनाधिनता, प्रेमाच्या नावावर होणारी फसवणूक आणि सर्वसामान्य स्त्रीसारखी अनेक स्वप्ने पाहून रेश्मा आपले जीवन संपविते. 'फॅशन' या चित्रपटातून मॉडेलिंगच्या व्यवसायातील तडजोडी, यशानंतरचा आत्मविश्वास, मादक पदार्थांचे अतिसेवन करणाऱ्या मेघनाला वडिलांच्या प्रोत्साहनाने छोट्या शहरातील मुलीचा फॅशन मॉर्डल बनण्यासाठी घर सोडून जाण्यास प्रवास दाखविला आहे.

'वॉटर' या दीपा मेहता यांच्या चित्रपटाच्या माध्यमातून विधवा महिला आश्रमाची स्थिती दाखवण्यात आली होती. त्याठिकाणी धर्माच्या व समाजसेवेच्या नावाखाली चाललेल्या अनेक गैरप्रकारांना वाचा फोडण्यात आली होती.

'लज्जा' या चित्रपटामधून एखाद्या संकटात सापडलेल्या महिलेच्या मागे इतर महिला कशाप्रकारे उभ्या राहू शकतात व त्या तिला कशी मदत करतात, हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. 'मर्दानी' या चित्रपटाने केवळ एका स्त्रीचा एका बीभत्स व्यवसायाकडेही लोकांचे लक्ष वेधले आहे. या चित्रपटातून स्त्रियांनी आपले रक्षण कसे करावे हे तर दाखवले आहेच त्याचबरोबर समाजातल्या कायद्यांना सार्वत्रिक रूप असले तरी त्यामागे व्यक्तिगत संवेदनांनाही महत्त्व दिले पाहिजे असा संदेश दिला आहे.

'दंगल' या चित्रपटातून 'म्हारी छोरीया छोरोसे कम है के' असे म्हणत स्त्री-पुरूष समानतेचा संदेश देत मिस्टर परफेक्शनिस्ट आमीर खानने बॉलीवुडमध्ये चांगलीच मोठी 'दंगल' केली.

'देढ इश्किया' ही एक नव्हे तर तीन महिलांची कथा आहे. माधुरी दीक्षित व हुमा कुरेशी यांनी पडद्यावर साकारलेली भूमिका एका स्त्रीच्या जवीनातील सर्व पैलू अतिशय चांगल्या पद्धतीने रेखाटले आहे. आतापर्यंत फक्त स्त्रीलाच लग्नासाठी पुरूषांची मानसिकता पूर्ण करण्यापूरतीच मर्यादा होती पण इथे प्रकरण उलटे आहे. इथे माधुरी दीक्षितने आयुष्यातील एकटेपणा तोडण्यासाठी पुरूषांच्या आधार घेत नाही तर अनेक पुरूष स्वत:ला एकमेकांपेक्षा चांगले दिसण्यासाठी धडपडत आहे. स्त्री अस्मितेच्या दृष्टीकोनातून  हा एक नवीन आस्वाद घेणारा चित्रपट आहे.

'हायवे'मधून आपल्याला आपल्या घरात डोकावण्याची संधी देतो. आपल्या घरात येणारे नातेवाईक, सोबती, शेजारी यांच्या लक्ष ठेवायला शिकविते. आलिया भट्टने ज्या निरागसतेने आणि

गांभीयाने तिच्या घरात लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या व्यक्तीचे पात्र जगले आहे. सामाजिक बंधनात अडकलेल्या मुलीला स्वतःच्या घरातून शारीरिक व मानसिक रितीने मुक्त व्हायचे असते. अपहरणकर्त्याच्या जवळ तिला जास्त सुरक्षित वाटते.

'गुलाब गँग'मध्ये रज्जो (माधुरी दीक्षित) माधवपूर या गावातील गुलाब गँगची लीडर आहे. असहाय्य महिलांची रक्षा करणारी व लहान मुलींना शिकविणाऱ्या स्त्रीची व्यक्तिरेखा साकारली आहे. या गँगमधील महिला स्वतःला पुरूषांपेक्षा कमी समजत नाही. मारपीट करायला घाबरत नाही. 'रॉड इज गॉड' चा उपयोग करणारी आहे.

'मिर्च मसाला' (1987) केतन मेहता दिग्दर्शीत मिर्च मसालामध्ये एका सामान्य खेड्यातील स्त्रीची कहाणी आहे. स्मिता पाटील यांनी सोनूबाईची भूमिका अतिशय सशक्तपणे रेखाटली आहे. यामध्येच दीपाली नवलने गाव मुखियाच्या पत्नीची भूमिका केली आहे. आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी पतीच्या इच्छेविरूद्ध बंड पुकारते. प्रतिगामी काळातील महिला सक्षमीकरणाची खरोखरच एक प्रभावी कथा रेखाटली आहे.

'कहानी' या चित्रपटातून एका सशक्त स्त्रीचे चित्रण केलेले आहे. विद्या बालन तिच्या हरवलेल्या पतीच्या शोधात आहे. गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीत ती लंडन ते कोलकत्ता एकटीच प्रवास करते आणि तिचा हरवलेला नवरा शोधते. खुप सहनशील, निडर, धाडसी महिलेचं चित्रण केलेलं आहे. 'इंग्लिश-विंग्लिश' गौरी शिंदे दिग्दर्शीत एका स्त्रीचा स्वतःला शोधण्याचा प्रवास दाखविला आहे. चित्रपटाचे कथानक पूर्ण त्या स्त्रीभोवती (श्रीदेवी) फिरते. जिला तिची मुले आणि पती इंग्रजी बोलता येत नाही म्हणून कमी लेखतात. जेव्हा ती तिच्या भाचीच्या लग्नासाठी न्युयॉर्कला जाते तेव्हा ती तिथे गुप्तपणे इंग्रजी स्पिकींग वर्गात सामील होते. सुरूवातील घाबरलेली आत्मविश्वास कमी असलेली अनेक अडचणींवर मात करून एक मजबूत दृढ स्त्री म्हणून उदयास येते.

'पिंक'ने राष्ट्राला सांगितले आहे की जेव्हा एखादी महिला 'नाही' म्हणते तेव्हा याचा अर्थ 'नाही' होतो. तिने कोणते कपडे घातले किंवा कोणती जीवनशैली जगते हे महत्त्वाचे नाही. तिला तिच्या इच्छेविरूद्ध काहीही करण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही. अमिताभ बच्चन एका वकिलाच्या भूमिकेत आहे जो प्रभावशाली कुटुंबातील कुख्यात मुलांविरूद्ध कायदेशीर लढाईत अडकलेल्या

मुलींसाठी लढतो. 'लिपस्टिक अंडर माय बुरखा' हा महिलांच्या लैंगिकतेवर आधारीत चित्रपट आहे. निर्भयपणे स्त्रीवादी चित्रपट. 'क्विन' 2014 चा वंडर हिट, ज्याने कंगणा राणौतला तरूण स्त्रियांमध्ये युथ आयकॉन म्हणून जोडले. ही एका भोळ्या आणि अंतर्मुख मुलीची सहज वयात येणारी कथा आहे. जिचे लग्न होणार आहे म्हणून उत्साहीत असून एका भंगलेल्या स्वप्नातील अश्रु पुसून शॉक देऊन उभ्या राहिलेल्या मुलीचे पात्र साकारले आहे.

'मेरी कोम' ही एका भारतीय बॉक्सरची खरी जीवनकहाणी आहे. स्त्रीच्या चैतन्य आणि पूरोगामी जाणिवेची सर्वात मोठी अभिव्यक्ती आहे. मुलींसाठी व स्त्रियांसाठी प्रेरणादायी ठरलेली फिल्म 'मेरी कोम'ची कथा एका साध्या स्त्रीच्या संघर्षाने सुरू होते. ज्याला पहिला विरोध घरातच होतो. शून्यातून यशाच्या उंच शिखरावर पोहचणाऱ्या महिलेची ही कहाणी आहे. स्त्री अस्मितेचे उत्तम उदाहरण मेरी कोमने लग्नानंतर बॉक्सिंग क्षेत्रात पुनरागमन करून दोन मुलांची आई असूनही अनेक अडचणींवर मात करून भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचविणाऱ्या स्त्रीची संघर्षमय जीवनकथा आहे.

अशाप्रकारे अनेक दशकांपासून हिंदी चित्रपटातून महिलांच्या सक्षमीकरणाचे विविध पैलूंचे दर्शन दिसते.सबला नारी बनून तिच्या हक्कांसाठी उभी राहणारी, अन्यायाविरूद्ध आवाज उठविणारी, तिच्या प्रतिष्ठेसाठी आणि स्वाभिमानासाठी लढणारी आणि गरज पडल्यावर बंड करणारी स्त्री बनून विविध क्षेत्रात आपली छाप टाकणाऱ्या आजच्या स्त्रीचे प्रभावी सादरीकरण केले आहे.

निष्कर्ष :

1. स्त्री अस्मिता, समर्पण, शक्तीची जाणीव दिसून येते.
2. चित्रपटातून स्त्रीची वास्तववादी व अभिमानास्पद दर्शन घडविले आहे.
3. बदलत्या काळाचे व संस्कृतीचे प्रभावीपणे सादरीकरण केले आहे.
4. महिला केंद्रीत चित्रपटांनी समाजात क्रांती आणण्याचा प्रयत्न केला आहे.
5. चित्रपटांच्या नायिकांमध्ये दुर्गामातेचे रूप दिसून येते. हा बदल खरोखरच स्वागतार्ह आहे. कारण आजपर्यंत प्रेमळ, सोशिक, अत्याचारीत, पिडीत अशा स्त्रीचे रूप दर्शविले जात होते.

**संदर्भ :**


1. कलमनामा शंभरीची चित्रपटसृष्टी, पण....?, मे 6, 2013, ज्ञानतंत्र लॉगिन.
2. स्त्री जाणीवेचा हुंकार, प्रहार (लेख)
3. पडद्यावर स्त्री-पुरूष समानता दाखवणाऱ्या चित्रपटसृष्टीतील असमानता कमी करण्यासाठी झटणारी – वैष्णवी सुंदर, लेख, D-21 Jan. 2017.
4. 2010-2020 : चित्रपट – सरस्वती दातार (लेख – महाराष्ट्र मनोरंजन केंद्र)
5. रेखा देशपांडे यांचे दैनिक दिव्य मराठी, रविवारमध्ये प्रकाशित झालेले लेख.